<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १४६ खाली आदेश</u>

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. वादी मे. न्यायालयासमोर स्वतः हजर झालेनंतर वादी यांना समजले की, प्रतिवादी क्र. ३ हे दि. २७/१२/१९९१ रोजी मयत झालेबाबत वादीने पूर्वीचे वकीलांना त्यावेळी कळवले होते परंतु प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचे राहून गेले आहे. त्यामुहे सदर प्रतिवादीवा क्र. ३ बाबत दावा अबेट झाला आहे. सबब, सदर प्रतिवादी क्र. ३ बाबत दावा अबेट झालेला आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ हा १९९१ साली मयत आहे. प्रतिवादी क्र. ३ विरुध्द सदर दावा पूर्वीच atomatically abate झाला आहे. सदर अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

०४. वादींचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी प्रतिवादी क्र. १ हे दि. २७/१२/१९९१ रोजी मयत झाले आहेत असे वादीने नमुद केले आहे.

**०५.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस यांना त्यांची बाजू मांडण्याचा हक्क आहे. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात आला.

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.07.06 11:31:03 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |